# ग्रामीण कवितेतील ग्रामीण जीवनवास्तव

**डॉ. रामचंद्र मोरेश्वर वासेकर**
मराठी विभाग,
राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय,
सावली जि. चंद्रपूर

..................................................................................................................

ग्रामीण साहित्य ही संकल्पना १९६० नंतर प्रभावीपणे पुढे आलेली असली तरी त्याची पूर्वपिठीका १९२० पर्यंत नेता येते. साहित्यातील ‘ग्रामीण’ हा शब्द ग्राम या शब्दावरून मराठीत आलेला आहे. ग्रामीण साहित्यात गावतले समाजजीवन निसर्ग – शेती प्राणीजीवन चित्रित झालेले असते. ते सर्व गावाशीच निगडीत असते. ग्रामीण साहित्याचा केंद्र कृषीप्रधानता आहे. कृषी जीवन हे ग्रामीण साहित्याची मूल्यधारा आहे. कृषिजीवनाला केंद्रस्थानी ठेवूनच इथले उत्सव, सण, परंपरा, रूढी या सर्व गोष्टी निर्माण झालेल्या आहेत. ग्रामीण साहित्यामध्ये गावखेड्यातील लोकांची समृद्ध, लौकिक परंपर,ा परंपरागत चालत आलेले ज्ञानभंडार त्यांच्या किर्तनातून, भजनातून, ओवीतून, समुहगितातून आणि गितरचनेपासून तर कथा कथनातून विकसित झालेला आहे. ग्रामीण साहित्यात ग्रामीण कविता ग्रामसंवेदना, ग्रामसंस्कृती अन् ग्रामीण जीवन जाणिवांना व्यक्त करते. शेती, माती, पिक, पाणी आणि नाती, गोती या आशयविश्वाला ग्रामीण कविता साकार करते.

विश्वास जहागीरदार ग्रामीण कवितेच्या संदर्भात म्हणतात, ‘‘ग्रामीण कवितेमध्ये बाह्यवास्तव हे खेडे निसर्ग आणि पारंपरिक मूल्ये यातून घडलेले ग्रामजीवन आहे. आणि त्यात आकाररूपाला आलेली संवेदनशीलता त्या जीवनातील अनुभवविषयीच्या प्रतिक्रिया देत असते. अशा कवितेच्या निर्मितीच्या बुडाशी असलेली संवेदनशीलता ही ग्रामीण संवेदनशीलता आहे आणि अशी कविता ग्रामीण आहे असे स्थूलमानाने म्हणता येईल.’’ एकूणच ग्रामीण संवेदनशीलता ग्रामीण कवितेच्या मुळाशी आहे. असे लक्षात येते तर रविंद्र ठाकूर ग्रामीण कवितेच्या संदर्भात म्हणतात, ‘‘ग्रामीण वास्तवाला केंद्रस्थानी ठेवणारी ही कविता स्वाभाविकपणेच वास्तवभिमूख राहते म्हणजे ग्रामीण साहित्याच्या वास्तवशील प्रवाहाचा एक भाग म्हणून ग्रामीण कवितेचा विचार करावा लागतो.’’

ग्रामीण कवितामध्ये ग. ल. ठोकळ संपादित ‘सुगी’ (१९३३) या कविता संग्रहामध्ये ग्रामीण संवेदनशीलतेचे सकस बीज सापडतात. परंतु निखळ ग्रामीण जीवनवास्तवाला सुगीतील प्रातिनिधिक कविता स्पर्श करत नाही सुगी नंतर ग. ह. पाटील यांचा ‘रानजाई’ (१९३४) हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. आणि त्यांचाच ‘लिंबोळया’ दुसरा कवितासंग्रह (१९६१) मध्ये प्रसिद्ध झाला. या दोन्ही काव्यसंग्रहातून ग्रामजीवनाची ओढ व्यक्त होते. पण तिचा अविष्कार नागर मध्यमवर्गीय जाणिवेतूनच व्यक्त होतो.

ग्रामीण कवितेचा वास्तवपूर्ण अविष्कार ग. ल. ठोकळ यांच्या ‘मीठभाकर’ (१९३८) या कविता संग्रहातून घडते आणि म्हणूनच त्यांना ‘पहिले ग्रामीण कवी’ हे श्रेय ग. ल. ठोकळ यांना द्यावे लागते. ग्रामीण जीवनाभुवांची निष्ठापूर्वक अभिव्यक्ती भषा आणि रचनेची मन:पूत शैली यामुळे ग्रामीण कवितेच्या प्रवाहात ठोकळांची कामगिरी महत्वपूर्ण आहे.

ग्रामीण कवितेचा अस्सल आविष्कार 'बहिणाबाईची गाणी' (१९५२) होताना दिसतो. ग्रामीण वातावरणाचे खरे दर्शन बहिणाबाईच्या कवितेतून होताना दिसतो. अवघे ग्रामीण जीवन त्याच्या सर्व अंगोपांगांसह येथे शब्दरूप झालेले दिसते. वास्तव भिमुख ग्रामीण संवेदनशीलतेतून ही कविता आकाराला आली अन् ग्रामीण जीवन त्याच्या मूळ रंगरूपासह अभिव्यक्त झाले आहे.

'हिरवे जग' हा आनंद यादव यांचा कवितासंग्रह ग्रामीण माणसाचे कष्टाचे चित्रण करताना आशय आणि अभिव्यक्ती अस्सलपणे व्यक्त करते. ग्रामीण कवितेच्या प्रवाहात पुरूषोत्तम पाटील ना. धो. महानोर, विठ्ठल वाद्य, एकनाथ देशमुख, शंकर बडे, राजा मुकुंद यांची कविता ग्रामीण अनुभविश्वाला साकारताना दिसते. त्यानंतर गजमल माळी, उत्तम कोळगावकर यांनीही आपल्या काव्यातून ग्रामीण संवेदना मांडल्या.

कृषीकेंद्रीत गावगाडा हा निसर्गसन्मुख असतो. निसर्गातील क्रिया प्रतिक्रियेचे दर्शन ग्रामीण कवितेतून घडते. माती, पाऊस यांचे नाते अन् सृजन सामर्थ ग्रामीण कवितेत प्रत्ययकारकपणे येते. ना. धो. महानोर जेव्हा म्हणतात,

''या नभाने या भूईला दान द्यावे
आणि या मातीतून चैतन्य गावे''

तेव्हा भूमीही स्त्री रूपात प्रकट होते. निसर्गसन्मुख असणारी ही ग्रामीण
कविता पुढे ग्रामीण वास्तवाचा भेदक चित्रण करते. महानोर यांचा २०१३ मध्ये प्रकाशित झालेल्या 'वाहाटूळ' या काव्यसंग्रहात आजच्या खेडयांची अवस्था जणू या वावटळीत सापडलेल्या पाला पाचोळयासारखी संभ्रमित झाली आहे. असे चित्रण येते.

खेडे
आता तंटे बखेडे
कर्जाचे वेढे, देशी विदेशीच्या विळख्यात
ओस झालेले वाडे

(वाहाटूळ पृ.क्र.६१)

समकालीन भयान वास्तव मांडताना कवी पुढे म्हणतो,

या
धस्कटांच्या रानात
रानारानात ही वाहाटूळ
वेढून टाकणारी
भयंकर भयभीत उंचचउंच
कोरडया ठक्क आकाशात
सापडेल त्याला भोवडून टाकणारी
गावाकडे ... शेताकडे ....

इंद्रजित भालेराव ग्रामीण साहित्य प्रातांतील सशक्त नाव. त्यांचा अलिकडे प्रसिद्ध झालेला लहान मुलांसाठी बालकवितांचा 'गावाकड' काव्यसंग्रह यात शेतकऱ्यांच्या व्यथा आणि वेदनाच वास्तव दर्शन चित्रारतात.

कशी उन्हात, उन्हात तळतात माणसं

कशी मातीत, मातीत मळतात माणसं
कशी खातात जिवाला खस्ता
काळया बापाचं, बापाचं हिरव रान
काळया माईन, माईन पिकवल सोनं
पण त्यांच्या घामाचा भाव लई सस्ता

(गावाकड पृ.क्र. १)

शेतकऱ्याच्या घामाला मोल कसं मिळत नाही हे चित्रण भालेराव व्यक्त करतात हाच आशय ऐश्वर्य पाटेकर यांच्या 'भुईशास्त्र' या काव्यसंग्रहातून व्यक्त होतो.

शेतकऱ्यांनी कसावी शेती, पीकवावं पीक
ठरवू नये मालाचा भाव
एवढा सहज असतो का घामाच ठाव ....
आणि भाकरीच रामायन?

(भुईशास्त्र पृ. क्र. १०५)

बालाजी मदन इंगडे यांच्या 'मेलं नाही अजून आभाळ' या काव्यसंग्रहात नव्या संदर्भाने शेतकरी बापाचं वास्तव अधोरेखन करतात.

तिफनीतून
पेरलेली मुळाक्षरे
एका रेषेत उगवून आली
की बाप पाणी खुरपण खत
यांच्या वेलांटी काना मात्रा
योग्य ठिकाणी वापरून
एक अर्थपूर्ण परिच्छेद तयार करतो
आणि मळणी यंत्रातून त्याची प्रिंट काढतो
तर निव्वळ डॉट डॉट असलेली
'अर्थहिन प्रिंट त्याच्या हाती येते.

बदलत्या परिवेशात शेतकऱ्यांचे, ग्रामीण समाजजीवनाचे प्रश्न ग्रामीण कवितेतून व्यक्त होत आहे.

ग्रामीण कवितेत नारायण कुलकर्णी कवठेकर यांनी खेडयातील भेदक वास्तव प्रखरपणे मांडतात. राजन गवस यांचा (हुंदका), मोहन पाटील (गाव आणि मातेच्या कविता) या कविता लक्षणीय आहे. सुधाकर गायधनी यांनी देवदुत या चिंतनशील दिर्घकाव्यात सामान्य माणसाचे आणि शेतकऱ्यांचे मूलभूत प्रश्न मांडले फ. म. शहाशिंदे यांनी ग्रामीण वास्तव अधोरेखित केले आहे.

आज ग्रामीण कवितेचा पट अनेक अंगाने व्यक्त होत आहे. यामध्ये इंद्रजित भालेराव, प्रतिमा इंगोले, महेश केळूसकर, प्रकाश विठ्ठल किनगावकर, वसंत केशव पाटील, सदानंद देशमुख, श्रीकांत देशमुख, ऐश्वर्य पाटेकर, बालाजी इंगळे, नामदेव कोळी, राम वासेकर इत्यादी कवी ग्रामीण जीवनविश्व, ग्रामजीवनाचे बदलते संदर्भ ग्रामीण बोलीभाषा, शेतीतील लावण्य आणि कारूण्य, गावाचे गावपण नष्ट

होण्याचे दुभंगलेपण, मातीचा लढा आणि कठा, बदलत्या वास्तवातील अनुभवातील प्रामाणिकता जपत ग्रामीण कवितेची शब्दकळा साकारत आहे.

**संदर्भ :—**

१. विश्वास जहागिरदार, म.सा. पत्रिका ( ग्रामिण साहित्य विशेषांक) १९८०
२. रवींद्र ठाकूर, 'ग्रामिण कविता (लेख) 'साहित्य ग्रामिण आणि दलित' संपादक डॉ. ईश्वर नंदपूरे, विजय प्रकाशक, नागपूर
३. आनंद यादव, 'ग्रामिण साहित्य : स्वरुप आणि समस्या' मेहता पब्लिशिंग, हाऊस पुणे १९७८,